(CNR No. MHSN110001952020)

**नियमित दिवाणी दावा क्र.५२/२०२०**

**निशाणी ४९ सोबत**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.२ चा पुढील सरतपास वकील श्री.व्ही.बी.पाटील यांचेमार्फत शपथेवर सुरु</u>**

३. माझे नाव शिवाजी भिकू माने, वय ६५ वर्षे, धंदा शेती, रा. बाळेवाडी, ता. आटपाडी, जि. सांगली असे असून माझ्या सरतपासावर माझी सही आहे. त्यातील संपूर्ण मजकूर खरा व बरोबर आहे.

**<u>सरतपास पूर्ण.</u>**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.२ चा उलटतपास प्रतिवादी क्र.२ व ३ तर्फे वकील श्री.सी.व्ही.जाधव यांचेमार्फत सुरु</u>**

४. दावा मिळकत माझ्या माहितीची आहे. माझे शिक्षण जुनी सातवीपर्यंत झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीचे एकूण क्षेत्र २१ हेक्टर ८६ आर आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामध्ये ज्ञानेश्वर, शंकर व रुक्मिणी यांचा ४ आणेचा हिस्सा होता. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०३/०३/२००६ रोजी प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी ३ हेक्टर ३३.१७ आर क्षेत्राचे पहिले खरेदीपत्र करुन घेतले. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीपत्रापासून ३ हेक्टर ३३.१७ मध्ये प्रतिवादी क्र.२ व ३ यांची वहिवाट आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी व इतर सहहिस्सेदार यांच्या वहिवाटी इतर क्षेत्रामध्ये आहे.

५. हे म्हणणे खरे आहे की, आटपाडी न्यायालयातील तडजोडीप्रमाणे २ हेक्टर २३ आर क्षेत्र वादीला मिळालेले आहे. हे म्हणणे खरे

आहे की, प्रतिवादी क्र.२ व ३ यांच्या क्षेत्रापासून सदरचे वादीचे क्षेत्र वेगळे आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादीची ५ एकर २३ गुंठ्यात वहिवाट आहे.

६. हे म्हणणे खरे आहे की, माझे सदर गटात ० हेक्टर ७४.२६ आर क्षेत्र असून त्यामध्ये वहिवाट आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्याबाबत काही वाद राहिलेला नाही ज्याची त्याची वहिवाट स्वतंत्र आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**प्रतिवादी क्र.४ व ५ तर्फे कबुली कैफियत असल्यामुळे वकील सौ.एल.आर.माळी यांनी उलटतपास नाकारला.**

**प्रतिवादी क्र.१अ, १ब, १क, १ड, १इ यांचेविरुध्द दावा एकतर्फा चालू असल्याने त्यांचेमार्फत उलटतपास नाही.**

समक्ष, श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

ASHWINI JOTIRAM BACHULKAR

Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Date: 2026.01.08 12:09:07 +0530

आटपाडी.

दिनांक : ०८/०१/२०२६

(अ. जो. बाचुळकर)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
आटपाडी

*****